सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१

दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६ / ४७ commcoop२०११@gmail.com

जा.क्र.सआ/सर्वसा-१५/तनिवेकार्यवाही/परिपत्रक/२०१८ /२६८ दिनांक :३१ / ०७ /२०१८

## कार्यालयास प्राप्त तक्रार/न्यायालयीन कामकाजासंदर्भात करावयाची कार्यवाहीबाबत.

### -: परिपत्रक :-

राज्यातील विविध सहकारी संस्थांच्या कामकाजासंदर्भात/अधिका-यांच्या कामकाजाबाबत या कार्यालयास नागरीकांकडून,शासनाकडून, मा.पंतप्रधान महोदय, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे पोर्टलच्या माध्यमातून प्राप्त तक्रार अर्जावर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याबाबत राज्य शासनाने दि.१५/२/२०१८ रोजी दैनिक निर्गती शासन निर्णय निर्गमीत केलेला आहे. सदर प्राप्त निवेदन अर्जावर या कार्यालयाकडून विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था(प्रशासन/लेखापरीक्षण)/ जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था/जिल्हा विशेष लेखा परिक्षक /सहाय्यक निबंधक यांचेकडे चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करणेसाठी निर्गमित केले जातात. सबंधित कार्यालये सदर तक्रारी पुन्हा सबंधित सहकारी संस्थाकडे / कनिष्ठ कार्यालयाकडे कार्यवाहीसाठी पाठवित असलेचे या कार्यालयाचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत:-

१.क्षेत्रीय पातळीवर प्राप्त तक्रार अर्जामधील विषयाच्या अनुषंगाने चौकशी करणेबाबत ज्या अधिका-यास कार्यवाही करणेबाबत कळविण्यांत आले आहे. त्या अधिका-यानेच चौकशी करुन अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. चौकशी करताना सबंधित तक्रारदाराला त्यांचे म्हणणे मांडणेची संधी देण्यात यावी व सुनावणी दरम्यान प्राप्त दस्तावेज व उपलब्ध परिपत्रकें/शासन निर्णय/ कायदा/नियमांचे उल्लंघनाबाबत गुणवत्तेवर आधारीत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा.

२.मुख्यालयास प्राप्त होणा-या खात्याच्या अधिका-यांविरुध्दच्या प्राप्त तक्रारी संदर्भात ज्या अधिका-याविरुध्द तक्रार असेल त्याच अधिका-याकडे चौकशीचे कामकाज न देता त्यांचे वरीष्ठ अधिका-याने स्वत: चौकशीचे कामकाज करुन मुद्देनिहाय व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा.

३.विभागातील अधिका-याविरुध्द विशिष्ट व चौकशीयोग्य उल्लेख असलेल्या मुद्यांबाबत प्राप्त अर्जाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) सहाय्यक निबंधकाविरुध्द प्राप्त अर्जावर उपनिबंधक/जिल्हा उपनिबंधक यांनीच चौकशी करावी.

ब) उपनिबंधकाविरुध्द प्राप्त तक्रार अर्जावर जिल्हा उपनिबंधक यांनीच चौकशी करावी.

क) जिल्हा उपनिबंधकाविरुध्द प्राप्त अर्जावर विभागीय सहनिबंधक यांनीच चौकशी करावी.

ड) विभागीय सहनिबंधकाविरुध्द प्राप्त अर्जावर अपर निबंधक/इतर विभागाचे विभागीय सहनिबंधक यांनीच चौकशी करावी.

इ) अपर निबंधकाविरुध्द प्राप्त तक्रार अपर आयुक्त यांनीच चौकशी करावी.

सदर बाबींचे काटेकोरपणे पालन होईल असे पहावे.

४. शासकीय अभियोक्ता यांचेकडून तसेच शासनाकडून या कार्यालयास प्राप्त होणा-या न्यायालयीन प्रकरणांबाबत रिट/याचिकेची प्रत हस्तांतरीत करणे व परिच्छेदनिहाय अभिप्राय सादर करणे व वेळोवेळी सुनावणीस हजर राहून वरीष्ठांना अवगत करणेसाठी या कार्यालयाकडून अधिनस्थ विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था/जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था/ जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था यांना प्राधिकृत केले जाते. या अनुषंगाने मुख्यालयाने ज्या अधिका-यांना प्राधिकृत केले आहे. त्यानींच व्यक्तीशः कामकाज पहावे. तसेच ज्या प्रकरणांमध्ये सहकार विभागातील अधिकारी मुख्य प्रतिवादी आहेत.तेथे परिच्छेदनिहाय अभिप्राय सादर करतांना मुद्देसूद व कायदा नियमातील तरतूदींचा स्पष्ट उल्लेख करुन सादर करावेत, केवळ मोघम स्वरुपाचे अभिप्राय सादर करु नयेत.आपल्या अधिनस्थ अधिका-यांना प्राधिकृत करु नये. तरी उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अमंलबजावणी करावी.

सही/-

(डॉ.विजय झाडे)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे

**प्रत:-तात्काळ कार्यवाहीसाठी रवाना**

१.विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)(प्रशासन/लेखापरीक्षण)
२.जिल्हा उपनिबंधक सहकारी (संस्था) /जिल्हा विशेष लेखा परीक्षक सहकारी संस्था सर्व
३.कार्यासन अधिकारी, (सर्व) मुख्यालय पुणे